**ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी**
**दर्जेदार साधन सामुग्री वापरण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : ग्रापापु-१०९७/प्र.क्र.१०४/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : ११ डिसेंबर, १९९७.**

**परिपत्रक :-** शासनाने राज्यातील सर्व जनतेला पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्याचा दृढ निर्धार केला आहे. त्यासाठी मंत्रालय स्तरापासून क्षेत्रीय स्तरापर्यंत संपूर्ण पाणी पुरवठा यंत्रणेची पुनर्रचना नव्याने करण्यात आली आहे. तथापि ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे यश हे या योजनेसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामग्रीच्या दर्जावर अवलंबून असते. यास्तव या योजनांसाठी वापरण्यात येणारी साधनसामग्री ही दर्जेदार असणे आवश्यक आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी वापरण्यात येणारी साधनसामग्री खरेदी करताना ती दर्जेदार असेल याची दक्षता घेण्यात यावी व अशी दर्जेदार साधनसामग्रीच पाणी पुरवठयाच्या योजनांसाठी वापरण्यात येईल याची सर्व क्षेत्रिय यंत्रणानी नोंद घ्यावी.

३. साहित्य भारतीय मानक संस्थेच्या (ISI) शर्तिप्रमाणे असल्याबाबत खात्री करुन घ्यावी. साहित्य पुरवठा खात्याकडून कंत्राटदाराना द्यावयाचा असेल तेव्हा खात्यास पुरवठा दाराकडून पुरवठा होत असलेला साहित्य स्वीकृत करण्यापूर्वी तृतीय पक्षाकडून (Third Party Inspection) तपासणी करुन घ्यावी व सदर अट पुरवठा आदेशामध्ये अनिवार्य करावी. निविदा शर्तीप्रमाणे कंत्राटदाराने साहित्य आणावयाचे असेल तर सदर साहित्य योग्य व दर्जेदार असल्याबाबत स्थानिक अभियांत्रिकी महाविद्यालय/तंत्रनिकेतन/प्रयोगशाळेकडे नमूने पाठवून तपासून खात्री करुन घेण्यात यावी. विशेषतः सिमेंट, लोखंडी सळी, वाळू, ब्लीचिंग पावडर, तुरटी इत्यादी बाबत सदर काळजी घेणे अत्यावश्यक आहे. सदर मुद्दे ठळक व सूचक असून योजनेवर वापरावयाचे सर्व साहित्य दर्जेदार असल्याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सर्व आवश्यक चाचणी तपासणी करुन वापरण्याबात अचूक निर्णय घ्यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(रु. न. देशमुख)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सदस्य सचिव, (तांत्रिक/प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)
४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
५. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
६. कार्यकारी अभियंता / उप अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
7. निवड नस्ती , (पापु-०७).पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.